CAREERINDIA

**SL. No. : DD**

ಒಟ್ಟು ಪ್ರಶ್ನೆಗಳ ಸಂಖ್ಯೆ : 64 ]
Total No. of Questions : 64 ]

**CCE PF**
**REVISED**

[ ಒಟ್ಟು ಮುದ್ರಿತ ಪುಟಗಳ ಸಂಖ್ಯೆ : 8
[ Total No. of Printed Pages : 8

ಸಂಕೇತ ಸಂಖ್ಯೆ : **08-M**

**Code No. : 08-M**

# ವಿಷಯ : ಪ್ರಥಮ ಭಾಷೆ — ಮರಾಠಿ
# Subject : First Language — MARATHI

**( ಹೊಸ ಪಠ್ಯಕ್ರಮ / New Syllabus )**

**( ಖಾಸಗಿ ಅಭ್ಯರ್ಥಿ / Private Fresh )**

ದಿನಾಂಕ : 23. 03. 2018 ]
[ Date : 23. 03. 2018

ಸಮಯ : ಬೆಳಿಗ್ಗೆ 09-30 ರಿಂದ ಮಧ್ಯಾಹ್ನ 12-45 ರವರೆಗೆ ]
[ Time : 09-30 A.M. to 12-45 P.M.

ಗರಿಷ್ಠ ಅಂಕಗಳು : 125 ]
[ Max. Marks : 125

## विद्यार्थ्यांना सामान्य सुचना :

1. प्रश्न पत्रिकेमध्ये बहुपर्यायी आणि वस्तूनिष्ठ प्रकारचे 64 प्रश्न आहेत.

2. प्रश्न पत्रिका विरुद्ध बाजूच्या आच्छादनाने सील ( बंद ) करण्यात आली आहे. परोक्षा सुरू झाल्यावर उजव्या बाजूने कापून तुम्हाला ती उघडावयाची आहे. प्रश्न पत्रिकेमधील सर्व प्रश्न व्यवस्थित आहेत की नाहीत ते तपासून पाहा.

3. बहूपर्यायी आणि वस्तुनिष्ठ या दोन्ही प्रकारच्या प्रश्नासाठी दिलेल्या सुचनांचे पालन करा.

4. उजव्या बाजूच्या कडेला ( काठावर ) असलेली संख्या पूर्ण गुण दर्शविते.

5. पेपरची उत्तरे सोडविण्यासाठी दिलेला जास्तीत जास्त वेळ प्रश्न पत्रिकेच्या पृष्ठावर वरील भागात दिलेला आहे. त्यामध्ये प्रश्न पत्रिका वाचण्यासाठो 15 मिनिटेही दिलेली आहेत.

येथून कापा.

**TEAR HERE TO OPEN THE QUESTION PAPER**
प्रश्न पत्रिका येथून कापून उघडा.

**Tear here**



www.careerindia.com

CAREERINDIA



## विभाग-A

### ( गद्य पद्यांशावर आधारोत )

I. खालील प्रश्नांची प्रत्येकी **एका** वाक्यात उत्तरे लिहा. 16 × 1 = 16

1. वसईचा सरसुभा अखेर चिमाजी अप्पांनी कोणाकडे सोपविला ?
2. स्वतंत्र भारताच्या पहिल्या मंत्रिमंडळाचे कायदामंत्री कोण होते ?
3. डॉ० बाबासाहेब आंबेडकरांचे दुसरे दैवत कोणते ?
4. सावित्रीबाई ज्योतिबांना कोणत्या नावाने संबोधत ?
5. 'क्रांती ज्योती सावित्रीबाई' या पाठाचा वाङ्मयप्रकार कोणता ?
6. सातवी पास झाल्यावर उत्तम कांबळे पुढील शिक्षणासाठी कोणत्या गावी गेले ?
7. गंगूबाई हनगलांनी कोणत्या घराण्याची गायकी परदेशात लोकप्रिय केली ?
8. धारवाडच्या राष्ट्रीय विद्यालयाचे मुख्याध्यापक कोण होते ?
9. 'विरहिणी' म्हणजे काय ?
10. भागवत संप्रदायाची स्थापना कोणी केली ?
11. भुकेलेली पोरे कशी धावतात ?
12. 'मनाचे पिंजरे' हा पाठ कोणत्या पुस्तकातून निवडला आहे ?
13. डॉ० रविंद्र कोल्हे व त्यांच्या पत्नी कोणत्या भागात समाजसेवा करीत आहेत ?
14. लोकसाहित्यात माहेरचा दूत असे कोणाला मानले आहे ?
15. मगध देशाचा शिशुपालाच्या मदतीस आलेला राजा कोण ?
16. धरण बांधणारी स्त्री पाटी खाली काय झाकते ?

www.careerindia.com

CAREERINDIA



II. खालील प्रश्नांची उत्तरे **तीन-चार** वाक्यात लिहा. 13 × 2 = 26

17. डोळस माणसाने आंधळ्यांना कसे समजावले ?

18. बाल परवेशी आणि नाना परवेशी म्हणजे काय ?

19. "तू मरत का नाहीस ? कशाला जगतोस भुईला भार होऊन" संदर्भासह स्पष्टीकरण द्या.

20. केशवकुमार यांचा थोडक्यात परिचय लिहा.

21. गुराख्याच्या जीवाची आग का होते ? आणि त्यानंतर तो काय करतो ?

22. ग्रामीण भागातील स्त्रियांना कोणती जीवट सवय असते ?

23. "तुम्ही त्यांशी कशासाठी भांडता ?" संदर्भासह स्पष्टीकरण द्या.

24. दैवी शक्ती कोणती ? आणि त्या जोरावर आंबेडकरांनी काय मिळविल ?

25. तात्यांच्या जवळ किती एकर जमीन होती ? व त्यांनी ती कशी मिळविली होती ?

26. सावित्रीबाईंचे जन्मगाव कोणते ? त्यांची आई त्यांना काय म्हणायची ?

27. पाहुण्यांची वर्तणूक कशी आहे ?

28. "कुणी एखादी पारु, कुणी एखादी राही" संदर्भासह स्पष्टीकरण द्या.

29. भुकेलेले जीव काय करतील असे विंदा म्हणतात ?

www.careerindia.com

CAREERINDIA



III. खालील प्रश्नांची उत्तरे **पाच-सहा** वाक्यात लिहा. $10 \times 3 = 30$

30. चिं. वि. जोशींच्या घरी काकूबाईंचे आगमन कसे झाले ? त्या आल्याबरोबर मुलांना काय म्हणाल्या ?

31. पावसाळ्याचा हिशेब अनंत काणेकर कसा घालतात ?

32. शिक्षणामुळे आदिवासी मुलांच्यात कोणते परिवर्तन झाले ?

33. वाटणीच्या घोळाने घरात काय घडत होते ? गणातात्यांना धाकट्या मुलाचा राग का आला ?

34. श्रीकृष्णाच्या प्राप्तीसाठी रुक्मिणीने काय केले ? आणि प्राप्ती न झाल्यास ती काय करणार आहे ?

35. ढोंगी गुरु भक्तीचे अवडंबर कसे माजवितात ?

36. पृथ्वीला आपल्याकडे आकर्षित करण्यासाठी कोण कोण व कसे प्रयत्न करीत आहेत ?

37. धरण बांधणाऱ्या स्त्रीच्या कष्टाचे तुमच्या शब्दात वर्णन करा.

38. अब्दुल करीम खाँ व गंगूबाईंची भेट कशी झाली ? त्यांनी कोणते उद्गार काढले ?

39. नेनंता गुराखी कृष्ण होऊ शकला नाही असे कवी का म्हणतो ?

IV. खालील प्रश्नांची उत्तरे **आठ-दहा** वाक्यात लिहा. $5 \times 4 = 20$

40. 'गृहिणी मंडळ' ( हाऊस वाईव्हस ) या संस्थेबद्दल सविस्तर माहिती लिहा.

41. 'हिरवे सांगाती' या पाठात पिंपळ, जांभूळ, कडुनिंब या झाडांविषयी गुलजार काय सांगतात ?

42. कवी यशवंतानी कृष्ण, कण, सौभद्र व मार्कंडेय यांचे दाखले का दिलेले आहेत ? ते स्पष्ट करा.

43. संत तुकडोजींना त्यांच्या स्वप्नातील भारतात कोणकोणत्या गोष्टी अपेक्षित आहेत ?

44. खाली दिलेल्या कवितेच्या ओळी पूर्ण करा.

कोसळली ................................................

.............................................................

.............................................................

......................................... असे सत्कार ।।



www.careerindia.com

CAREERINDIA



## विभाग-B

### ( व्याकरणावर आधारोत )

V. खालील पर्यायातून योग्य उत्तर निवडून लिहा. 10 × 1 = 10

45. 'निरक्षर' या संधीची फोड अशी होते.

(अ) निर + अक्षर (ब) निः + अक्षर

(क) नि + अक्षर (ड) निर + क्षर

46. "मधुराने सुरेख नृत्य केले" या वाक्यात हा प्रयोग आहे.

(अ) कर्तरी प्रयोग (ब) यापैकी नाही

(क) भावे प्रयोग (ड) कर्मणी प्रयोग

47. "रियाने काकूंना चहा करुन दिला." या वाक्यात हा काळ आहे.

(अ) भविष्य काळ (ब) वर्तमान काळ

(क) भूत काळ (ड) यापैकी नाही

48. 'नाकापेक्षा ...................... ही म्हण पूर्ण होण्यास खालीलपैकी हे शब्द घालावे लागतील.

(अ) बोंगा मोठा (ब) नथ जड

(क) ओठ मोठे (ड) मोती जड

49. "ढग भरुन आले; पण पाऊस पडला नाही" हे या प्रकारचे वाक्य आहे.

(अ) केवल वाक्य (ब) संयुक्त वाक्य

(क) मिश्र वाक्य (ड) उद्गारार्थी वाक्य

50. "जमीन व पाणी या दोन्ही ठिकाणी वावरणारे" यासाठी एक शब्द हा आहे.

(अ) जलचर (ब) भूचर

(क) खेचर (ड) उभयचर

51. 'उत्तीर्ण' याचा विरुद्धार्थी शब्द हा आहे.

(अ) विस्तीर्ण (ब) अनुत्तीर्ण

(क) संकीर्ण (ड) पास



www.careerindia.com

CAREERINDIA



52. "बापरे केवढा मोठा साप." या वाक्यात बापरे या शब्दानंतर हे विराम चिन्ह घालावे.

(अ) उदगारवाचक (ब) पूर्ण विराम

(क) स्वल्प विराम (ड) प्रश्नार्थक चिन्ह

53. "चिंच फारच आंबट आहे" यातील 'आंबट' या शब्दाची जात ही आहे.

(अ) संख्या विशेषण (ब) गुण विशेषण

(क) विधि विशेषण (ड) क्रिया विशेषण

54. 'बोकड' या शब्दाचे स्त्रीलिंगी रूप हे आहे.

(अ) बोकी (ब) शेळी

(क) म्हैस (ड) बोकडीण

VI. खालील दोन पदातील संबंध ओळखून तिसऱ्या पदाशी जुळणारा शब्द लिहा. 4 × 1 = 4

55. सप्तमी : त, ई, आ : : तृतीया : .............

56. यथाशक्ती : अव्ययीभाव : : नवरात्र : .............

57. भाकरी : कन्नड : : कोबी : .............

58. डोळे : नयन : : पक्षी : .............

VII. सूचनेप्रमाणे खालील प्रश्नांची उत्तरे लिहा. 3 × 2 = 6

59. 'सवे असता नाथा आपण प्रासादाहुनी प्रसन्न कानन' अलंकार ओळखून लक्षणे सांगा.

60. "वदनि कवळ घेता नाम घ्या श्रीहरीचे"

वरील ओळीचे गण पाडून वृत्त ओळखा.

61. खालील वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.

i) भान हरपणे

ii) हात पाय गळणे



www.careerindia.com

CAREERINDIA



## विभाग-C

### ( लेखन व रचनेवर आधारोत )

VIII. 62. खालीलपैको कोणत्याही **एका** कल्पनेचा विस्तार करा. 1 × 3 = 3

(i) बोले तैसा चाले त्याची वंदावी पाऊले

(ii) शील हेच श्रेष्ठ भूषण.

IX. 63. तुमच्या शाळेत पर्यावरण दिन कसा साजरा केला या बद्दल मित्राला / मैत्रिणीला पत्राने कळवा. 1 × 5 = 5

**किंवा**

तुमच्या गल्लीतील साचलेला कचरा स्वच्छ करण्याबद्दल ग्रामपंचायत / नगरपालिकेच्या आरोग्याधिकाऱ्याकडे अर्ज करा.

X. 64. खालीलपैकी कोणत्याही **एका** विषयावर **15** ते **20** ओळी निबंध लिहा. 1 × 5 = 5

(i) युवकांमधील वाढती व्यसनाधीनता

(ii) वृक्ष आपले मित्र

(iii) मोबाईल–शाप की वरदान.

www.careerindia.com

www.careerindia.com